# अर्नेस्टची देणगी

कॅथरीन टकर विंडहॅम, चित्रे व सजावट : फ्रँक हार्डी
अनुवाद : सुजाता गोडबोले



अलाबामा राज्यातील सेल्मा येथील सार्वजनिक वाचनालयाच्या शतकपूर्ती सोहळ्याच्या प्रसंगी प्रसिद्ध कथा कथनकार कॅथरीन टकर विंडहॅम यांनी अर्नेस्ट डॉसन यांची सत्यकथा कथन केली. १९३० च्या दशकात ते एक लहान मुलगा असताना त्याकाळच्या वंशभेदाच्या पद्धतीनुसार डॉसन यांना सेल्माच्या सार्वजनिक वाचनालयात प्रवेश करण्यास बंदी होती. परंतु त्यांचे पुस्तक प्रेम आणि शिकण्याची इच्छा प्रबळ असल्याने ते अखेर शिक्षक झाले. अनेक वर्षांनी सेल्मा येथील वाचनालयात मुलांचा विभाग उघडण्यासाठी त्यांनी मोठी देणगी दिली म्हणजे सर्व वंशांच्या छोट्या वाचकांचे वाचनालयात स्वागत होईल आणि त्यांना पुस्तकांची जादू अनुभवता येईल.

कॅथरीन टकर विंडहॅम यांनी डझनाहून अधिक लोकप्रिय पुस्तके लिहिली आहेत आणि त्या कथाकार म्हणून व रेडिओवरील त्यांच्या कार्यक्रमांमुळे देशभर प्रसिद्धी पावल्या आहेत. फ्रँक हार्डी हे कलाकार असून सेल्माच्या 'युथ डेव्हलपमेंट सेंटर' चे संस्थापक आहेत. ते दोघेही अलाबामा राज्यातील सेल्मा येथे राहतात. ते दोघेही 'सेल्मा-डॅलस कौंटीच्या सार्वजनिक वाचनालयाचे' हिरो आहेत.

# अर्नेस्टची देणगी



अर्नेस्ट एल. डॉसन

१९२२-१९९४

यांच्या स्मृतीस समर्पित

“चल अर्नेस्ट! आपल्याला सेल्माला जायचं आहे!”

९ वर्षांच्या अर्नेस्टला आणखी आग्रह करण्याची मुळीच गरज नव्हती, तो सेल्माला जाण्याची वाटच पाहत होता. तो पळतच घोडागाडीकडे गेला आणि उडी मारून मागच्या भागात बसला.

त्याची आई, परली मे नेहमीप्रमाणेच तिचा नवरा झॅक याच्या शेजारच्या सीटवर बसली होती. अर्नेस्टला आठवत होते तेव्हापासून ते दोघे नेहमी असेच बसत असत. आपल्या बाबांनी लगाम ओढून “चल निघ” असे म्हणण्याची तो वाट पाहत होता. या इशाऱ्यावर खेचराने गाडी ओढायला सुरुवात केली आणि घराच्या आवाराबाहेर पडून ते सेल्माला जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर वळले. सेल्माला जाण्याची हीच पद्धत होती आणि अर्नेस्टला सर्व काही नेहमीच्या पद्धतीने केलेले आवडत असे.

“अर्नेस्ट, नीट बस हं, पडू नकोस. रस्त्यात खाच-खळगे आहेत,” त्याची आई म्हणाली.



तिची ही सूचना सुद्धा नेहमीप्रमाणेच होती.

घोडागाडीला जसा वेग आला, तसे एक चाक कुरकुर करू लागले. “घरातून निघण्याआधीच त्याला तेल घालायला हवे होते”, त्याचे बाबा म्हणाले. “तेल घातले असते तर बरे झाले असते,” त्याची आई म्हणाली. “या आवाजाचा मला त्रास होतो.”

अर्नेस्टला मात्र चाकाचा हा आवाज आवडायचा. त्याला त्यातून गाणे ऐकू यायचे, “सेल्माला जायचं. सेल्माला जायचं. सेल्माला जायचं.” तो पहिल्यांदा शहरात कधी गेला होता हे आठवायचा तो प्रयत्न करू लागला, पण त्याला आठवेना. “मी त्यावेळी लहान बाळ असणार,” असे त्याने ठरवले आणि आईने आपल्याला पांघरुणात गुंडाळून हातात कसे धरले असेल याचा तो विचार करू लागला.

त्याच्या आजीने केलेली एक गोधडी गाडीच्या मागच्या बाजूला घालून तो त्यावर बसत असे हे त्याला आठवले. तो इतका लहान होता की त्याला कठड्याच्या पलीकडचे काही दिसत नसे. पण आता तो रस्त्याकडे तोंड करून पाय खाली सोडून बसायचा तेव्हा त्याचे अनवाणी पाय जवळ जवळ रस्त्याला पोचायचे आणि त्याला बाहेरचे सर्व काही दिसायचे: पाईनची दाट झाडी, कपाशीची शेते, कामगारांच्या वस्तीतील घरे, एखादा ओढा, मधूनच एखादे चर्च, कुरणात चरणारी गायी-गुरे. पुढच्या वर्षी, १९३२ मध्ये तो दहा वर्षाचा होईल, मग त्याला एकट्याला घोडागाडी चालवता येईल. त्याच्या पलंगाशेजारच्या भिंतीवर त्याने ती तारीख लिहून ठेवली होती. त्या दिवशी बाबा त्याला एकट्याला लगाम हातात धरू देणार होते, ते विसरायला नको.

आता सुद्धा तो गावात एकट्याने कुठेही जाण्याइतका मोठा झाला होता. सगळा वेळ त्याला आता आई-बाबांबरोबर असण्याची जरूर नव्हती. कधी कधी त्याला शांतपणे पिवळ्या रंगाच्या दुकानाबाहेरच्या बाकावर बसायला आवडायचे.

तिथे इतर लोक जमून गप्पा मारत असायचे, ते ऐकायला त्याला आवडे. आज त्याला इकडे तिकडे हिंडून पाहायचे होते.

“न्यायालयाच्या इमारतीवरल्या त्या घड्याळाकडे लक्ष ठेव. बारा वाजेपर्यंत या पिवळ्या दुकानाबाहेर येऊन बस,” त्याचे बाबा म्हणाले.

अर्नेस्टला घड्याळ समजत होते. बाहेरच्या खोलीतल्या शेकोटीच्या वरच्या कोनाड्यातल्या घड्याळाला किल्ली द्यायची हे तर त्याचेच काम होते. जवळच एका खिळ्यावर लावलेली पितळी किल्ली घेऊन तो किल्ली देऊ लागला की बऱ्याच वेळा त्याचे बाबा म्हणायचे,



"घड्याळ कधी मागे पडू देऊ नकोस. वेळ महत्त्वाची असते. कधीच उशीर करू नकोस." अर्नेस्टला कधीच उशीर होत नसे, हा नियम त्याने आयुष्यभर पाळला.

त्याला चांगले वाचता येत असे. त्याला पुस्तके आवडत असत. जी ठिकाणे त्याने कधी पाहिली नव्हती त्यांच्याबद्दल आणि ज्यांनी इतिहास घडवला अशा लोकांविषयी वाचायला त्याला आवडे. तो रोज रात्री बायबल वाचायचा आणि मोठा झाल्यावर संपूर्ण बायबल वाचायचे त्याने ठरवले होते.

अमेरिकेतील मूळच्या म्हणजे इंडियन लोकांविषयीची पुस्तके आपल्याकडे असावीत असे त्याला वाटायचे. बाबांच्या नांगरामागे जाताना त्याला सापडणारे बाण तो आपल्या खिशात भरून घ्यायचा. कधीकधी त्याला मातीच्या भांड्यांचे तुकडे सापडायचे. बाण आणि ही भांडी बनवणारे लोक कसे बरे असतील याचा तो विचार करायचा.

अर्नेस्ट म्हणायचा, "मी मोठा झालो की माझ्या घरात खोलीभर पुस्तके असतील, अगदी जमिनीपासून छतापर्यंत."



त्या दिवशी सेल्मामध्ये फिरताना त्याच्या पुस्तकांच्या प्रेमामुळे तो आपोआप कार्नेजी वाचनालयाकडे गेला, जणू काही जादूच्या गालिचानेच त्याला तेथे नेले होते. पुस्तकालय! तिथे एक खोलीच नव्हे, तर पूर्ण इमारतच पुस्तकांनी भरलेली होती! अर्नेस्ट यापूर्वी कधीच वाचनालयात गेला नव्हता. सेल्मामध्ये एक वाचनालय आहे हे त्याला कोणीच सांगितले नव्हते. पण आता तो त्याच्या समोर उभा होता. ती एक मोठी दगडी इमारत होती आणि त्याच्या दरवाजावर 'कार्नेजी वाचनालय' असे कोरले होते. त्याला 'कार्नेजी' या शब्दाचा अर्थ माहित नव्हता, पण 'वाचनालय' हा शब्द मात्र त्याला माहित होता.



अर्नेस्ट पायऱ्यांवरून पळतच वर गेला आणि त्याने एक जाडजूड दरवाजा ढकलला. त्याने ज्या खोलीत पाऊल टाकले तशी खोली त्याने कधीच पहिली नव्हती. तो अचंबित झाला आणि आश्चर्याने सगळीकडे पाहू लागला.

एका उंच टेबलामागून एका बाईंनी कठोर आवाजात विचारले, “ए पोरा, तुला काय हवे आहे?” आपल्या चष्म्याच्या काचेतून त्या रागाने त्याच्याकडे पाहत होत्या.

“मॅडम, मला प्लिज इथली पुस्तके वाचू द्याल का?”

त्या बाईंनी त्याच्याकडे अधिकच टक  लावून पाहत रागाने म्हटले, “या वाचनालयातील पुस्तके ही गोऱ्या लोकांसाठी आहेत. आम्ही काळ्या लोकांना ती वाचू देत नाही. तू इथून निघून जा पाहू!” असे म्हणताना त्यांच्या आवाजात तुच्छता भरलेली होती.

अर्नेस्ट हे ऐकून माघारी वळला आणि धडपडत बाहेर आला. तो रडत होता हे त्या बाईंना त्याला दिसू द्यायचे नव्हते.



हा दिवस फारच वाईट गेला. मान वर करून कुठेही न बघता हळू हळू चालत तो पिवळ्या रंगाच्या दुकानाकडे परत निघाला. बारा वाजण्याच्या कितीतरी आधी तो बाकाच्या एका टोकावर येऊन बसला. आजूबाजूला बसलेले लोक काय बोलताहेत याकडे त्याचे आज लक्ष नव्हते. बाबांनी त्याच्यासाठी आणलेल्या ‘हॉट डॉग’ ला देखील काही चव नव्हती. त्याच्या काकांनी त्याला दिलेले चॉकलेट सुद्धा त्याने खाल्ले नव्हते आणि काकांचे आभार मानायला देखील त्याला आज आठवण करून द्यावी लागत होती.

त्याच्या चुलत भावंडांनी त्याला दिलेले त्याचे आवडते आईस्क्रीम देखील त्याच्या घशाखाली उतरत नव्हते. या भावंडांनी कधी वाचनालयात जाण्याचा प्रयत्न केला असेल का असा विचार त्याच्या मनात आला, पण तसे विचारायचा त्याला धीरच झाला नाही.

अर्नेस्टला घरी जायचे होते. प्रेस्बिटेरियन चर्चच्या मनोऱ्यावरील घड्याळात चारचे ठोके पडले आणि त्याचे बाबा बाकावरून उठले आणि आपल्या मित्रांचा निरोप घेऊ लागले हे पाहून त्याला फार बरे वाटले.

“चला, घरी जायची वेळ झाली,” बाबा म्हणाले. “मला आणि अर्नेस्टला काही काम करायचे आहे आणि उद्या चर्चला जायची तयारी पण करायची आहे. उद्या चर्चमधल्या गाण्याचा दिवस आहे. तुम्ही सर्वजण या बरं का. तिथे खाण्याचे खूप पदार्थ असतील. परली मे नारळाची केक करून आणणार आहे - म्हणजे अर्नेस्टने आधीच संपवली नाही तर!”

सगळे हसले. आणि बाबांनी अशी त्याची चेष्टा केली म्हणून अर्नेस्टनेही हळूच हसण्याचा प्रयत्न केला. आई-बाबांनी आणलेले सामान गाडीत ठेवायला त्याने मदत केली, निघण्यापूर्वी खेचर कसे पाणी पीत आहे याकडे तो पाहत राहिला आणि मग गाडीत मागच्या बाजूला चढून बसला.

गाडीचे चाक अजून आवाज करत होते पण आता त्यात अर्नेस्टला गाणे ऐकू येत नव्हते. ते जणू म्हणत होते, “काळ्या लोकांसाठी पुस्तके नाहीत. काळ्या लोकांसाठी पुस्तके नाहीत. काळ्या लोकांसाठी पुस्तके नाहीत.”

ते घराजवळ आल्यावर बाबा त्याच्याकडे वळले आणि म्हणाले, “अर्नेस्ट, बाळ, काय झालं आहे?”

अर्नेस्टने त्याला छळणारी सगळी हकीकत त्यांना एका दमात सांगून टाकली. “पण बाबा, असं का?” तो हुंदके देत म्हणाला, “मी त्या वाचनालयात जाऊन पुस्तके का नाही वाचू शकत? हे काही बरोबर नाही.”

त्याच्या वडिलांनी लगेच उत्तर दिले नाही. अर्नेस्टला वाटले की कदाचित त्यांनी प्रश्न ऐकला नसेल. थोड्या वेळाने ते सावकाश म्हणाले, “हे बघ बाळ, हे बरोबर नाही, हे योग्यही नाही. पण हे असेच आहे. खरी परिस्थिती अशीच आहे.” हे सांगत असताना त्याच्या बाबांचा आवाज त्याला ओळखू येणार नाही इतका वेगळा वाटत होता. “कदाचित पुढे-मागे हे बदलेलही. पण त्यासाठी एखादा चमत्कारच व्हावा लागेल.”

त्याची आई काहीच म्हणाली नाही. पण ती बहुधा रडत असावी असे तिच्या श्वासाच्या आवाजावरून वाटत होते.

त्यानंतर त्या तिघांनी वाचनालयाचा विषय कधीच काढला नाही.

आपण ऐकलेले बोचरे शब्द आणि त्यामुळे झालेले दु:ख विसरण्याचा अर्नेस्टने खूप प्रयत्न केला. इझाबेला बाप्टिस्ट चर्चमध्ये गाण्याचा सराव करायला जाण्याचाही उपयोग झाला. त्याच्या आईने केलेल्या नारळाच्या केकचे लोकांनी केलेले कौतुक ऐकून त्याला खूप अभिमान वाटला आणि बाबांच्या एका मित्राने जेव्हा सगळी केक संपवली नाही म्हणून अर्नेस्टचे आभार मानले तेव्हा त्याने चेहऱ्यावर उसने हसू देखील आणले. अर्नेस्ट कायमच त्याच्या आई-वडिलांबरोबर रविवारी चर्चमध्ये जात असे. त्याच्या काकांच्या प्रवचनाकडे त्याचे बहुतेक वेळा लक्ष नसे पण तरीही तो कार्यक्रम संपेपर्यंत शांतपणे बसत असे. कधी कधी तो भिंतीला लावलेल्या फळ्या मोजत असे तर काही वेळा त्या लाकडावर दिसणाऱ्या गाठीच्या खुणा!

उन्हाळ्यातल्या एका रविवारी चर्चच्या भोवताली पसरलेल्या कपाशीच्या शेतांकडे तो खिडकीतून पाहत बसला होता.

बऱ्याच वेळा गांधीलमाशा आणि चिलटे उघड्या खिडकीतून आत यायची आणि चर्चमध्ये जमलेल्या लोकांच्या डोक्याभोवती घिरट्या घालायची. बायका जेव्हा आपल्या पर्सने किंवा पंख्याने त्यांना हाकलण्याचा प्रयत्न करायच्या तेव्हा अर्नेस्टला हसू यायचे पण त्याचे बाबा त्याच्याकडे पाहून आठ्या घालून मान हलवायचे.

एका रविवारी तर प्रवचन चालू असताना गांधीलमाशांचा एक मोठा थवाच आत शिरला आणि व्यासपीठावरच घिरट्या घालू लागला. मग सर्व सहाय्यक आणि व्यवस्थापक मंडळाचे सदस्य मदतीला आले आणि त्यांना बाहेर हाकलले. अर्नेस्टची एक मावशी म्हणाली की सैतानानेच त्या गांधीलमाशांना पाठवले असणार. अर्नेस्टला काही तशी खात्री वाटत नव्हती, पण तो बाबांना त्याबद्दल विचारायचे विसरूनच गेला.

कधी कधी प्रवचनकार चमत्कारांबद्दल बोलत असत. मग मात्र अर्नेस्ट लक्ष देऊन ऐकायचा. मग लाल समुद्र दुभंगतो आहे, जेरिकोच्या भिंती आपोआप पडत आहेत आणि सिंहाच्या गुहेतला डॅनियल अशी चित्रे तो मनासमोर आणायचा. येशूने केलेल्या चमत्कारांबद्दल ऐकायला त्याला आवडत असे. एका लहान मुलाच्या जेवणाद्वारे येशूने खूप मोठ्या जमावाला कसे खाऊ घातले ही त्याची खूप आवडती गोष्ट होती.

अर्नेस्टचे चर्चमधले स्वारस्य कधी कमी झाले नाही. थोडा मोठा झाल्यावर चर्चच्या गाणाऱ्या समूहात तो भाग घ्यायचा आणि रविवारच्या शाळेत लहान मुलांना शिकवायचा देखील. तो सगळ्यांचा नेता असायचा.

“अर्नेस्ट जे काही करतो त्यात तो सर्वात पुढे असतो. तो काही मागे राहणाऱ्यातला नाही,” असे त्याचे नातेवाईक म्हणायचे.

ही सर्वात पुढे राहण्याची क्षमता इतर क्षेत्रातही दिसून येत असे. तो सेल्मा मधील ‘नॉक्स अकॅडमी’त असताना त्याने पहिला नंबर कधी सोडला नाही आणि १९४३ साली पदवी घेतली त्या वर्षी तर तो वर्गाचा अध्यक्ष होता.



‘नॉक्स अकॅडमी’च्या वाचनालयात फारच थोडी पुस्तके होती, पण अर्नेस्टने याआधी न पाहिलेली अनेक पुस्तके तेथे होती. अजूनही त्याला सेल्माच्या कार्नेजी सार्वजनिक वाचनालयात प्रवेश नव्हता. त्याचे कारण त्याला अजूनही कळत नव्हते. पदवी मिळवल्यानंतर ‘नॉर्थ ब्रॉड स्ट्रीट’वरील ‘रॉक्सी थिएटर’ या काळ्या लोकांसाठीच्या चित्रपटगृहात प्रोजेक्टर चालवण्याचे काम करताना तो चित्रपटगृहाच्या व्यवस्थापनाचे काम देखील करत असे. १९४३ मध्ये काही महिन्यांनी त्याने अमेरिकेच्या नौदलात प्रवेश घेतला.

त्या काळातील त्याच्या वयाच्या हजारो तरुणांप्रमाणेच दुसऱ्या महायुद्धातील सहभागामुळे अर्नेस्टचे देखील आयुष्यच बदलून गेले. आता त्याचे जग टायलर आणि सेल्मा यापुरते मर्यादित राहिले नव्हते. ज्या गावांबद्दल त्याने केवळ ऐकले होते त्या ठिकाणी तो प्रत्यक्ष जाऊन आला होता. १९४६ साली नौदलातून सन्मानाने निवृत्त झाल्यावर जी. आय. कायद्यानुसार त्याला उपलब्ध झालेल्या शैक्षणिक संधींचा त्याने फायदा घेतला.

प्रथम त्याने शिकागोच्या ‘अमेरिकन टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट’ मधून पदवी घेतली. त्यानंतर न्यूयॉर्कला पूर्ण वेळ नोकरी करत असताना ‘सिटी कॉलेज’ मध्ये रात्रीच्या वर्गात प्रवेश घेऊन त्याने गणितात बी. एस. ही पदवी मिळवली. त्याच्या एका काकांनी हार्लेम मध्ये स्थापन केलेल्या (टायलरच्या बाप्टिस्ट चर्चप्रमाणेच ‘इझाबेला’ नावाच्या) चर्चमध्ये धर्मगुरूंचा सहाय्यक (डीकन) म्हणून सेवा देण्यासाठी वेळ काढत असे. आणि तो वाचनालयातही जात असे.



अर्नेस्टने शिक्षक म्हणून काम करण्याचा प्रयत्न केला, पण पौगंडावस्थेतील तरुण मुलांना शिकण्यात फारसे स्वारस्य नाही हे पाहून तो निराश झाला. विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या उत्तम वाचनालयाचा ते फायदा घेत नसत. अर्नेस्ट जेव्हा त्यांना सेल्माच्या कार्नेजी वाचनालयातून त्याला कसे हाकलून लावण्यात आले होते हे सांगे तेव्हा ते त्याच्याकडे अविश्वासाने डोळे विस्फारून पाहत!

अर्नेस्ट स्वभावाने अतिशय प्रेमळ होता. लहान मुलांना शिकवणे, गोष्टी वाचून दाखवणे किंवा गोष्टी सांगून त्यांना खिळवून ठेवणे हे तो मनापासून आणि आवडीने करत असे. म्हणून व्यवसाय म्हणून देखील त्याने लहान मुलांच्या शिक्षणाचे क्षेत्र  निवडावे असा काही मित्रांनी त्याला सल्ला दिला. मग या क्षेत्रातील पदवी घेण्यासाठी अर्नेस्टने परत एकदा 'सिटी कॉलेज' मध्ये प्रवेश घेतला.

अर्नेस्टला सर्वच वंशाची मुले मनापासून आवडत आणि अर्थात मुलांनाही तो आवडत असे. बालवाडीतील मुले तो जाईल तिकडे त्याच्यामागे जातात, त्याला मुळीच सोडत नाहीत आणि त्याच्याशी बोलत आणि सतत हसत असतात हे त्याच्या सहकाऱ्यांच्याही लक्षात आले होते. तीन, चार आणि पाच वर्षाच्या मुलांना जिथे पुस्तके हाताळता येतील अशा वाचनालयात तो घेऊन जात असे आणि मुले पुस्तकाची पाने उलटण्यात आणि त्यातील रंगीबेरंगी चित्रे पाहण्यात रमत असत.

तो नेहमी म्हणायचा, "मुलांना पुस्तकांची गरज असते, आणि त्यांच्या आई-वडिलांना देखील!"

त्याला साहित्यात जितकी रुची होती, तेवढाच त्याला प्रवास करण्याचा देखील उत्साह होता. अमेरिकेतील सर्व ५० राज्यांना भेट देण्याचे त्याचे ध्येय तर त्याने पूर्ण केलेच शिवाय १९ देशांचाही त्याने प्रवास केला आणि तिथल्या लोकांशी मैत्रीही केली. तो ज्या ज्या ठिकाणी जाई, तेथून आपल्या कुटुंबियांना आणि मित्र मंडळींना तो कार्डे पाठवत असे आणि आपल्या विद्यार्थ्यांसाठी तेथील चित्रे आणि पुस्तके - जरी ती परकीय भाषेतील असली तरीही - आणत असे.



अर्नेस्टने जरी जगभर प्रवास केला तरी तो आपले मूळ कधीच विसरला नाही. टायलरचे लोक आणि सेल्मा कायम त्याच्या आठवणीत होते. तो वरचेवर घरी सर्वांना भेटण्यास येत असे. आपल्या आई-वडिलांचा तो एकुलता एक मुलगा होता म्हणून त्याने त्यांना न्यूयॉर्कला आणले होते, म्हणजे तो त्यांची देखभाल करू शकेल. त्यांच्या मृत्यूनंतर त्याने त्यांचे टायलरच्या इझाबेला बाप्टिस्ट चर्चच्या दफनभूमीत दफन केले.

एकदा अर्नेस्ट व त्याचे न्यूयॉर्कचे मित्र डॉ. नॉर्मल पॉल सकाळी सेल्माला आले होते. शहरातील निरनिराळ्या इमारती पाहत शहरात एक फेरफटका मारत असताना ते सार्वजनिक वाचनालयासमोर आले.

“तुम्ही लहानपणी इथे बराच वेळ घालवला असणार,” डॉ. पॉल सहज म्हणाले.

“नाही, मी वंशभेद मानणाऱ्या राज्यात वाढलो आहे, हे तुम्ही विसरता आहात. मला वाचनालयात प्रवेश नव्हता,” अर्नेस्ट यांनी उत्तर दिले.

क्षणभर डॉ. पॉल स्तब्ध झाले. मग ते म्हणाले, “पण मग आता आपण तेथे जाऊया.”

आणि ते दोघेही वाचनालयात गेले.

वाचनालयातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले, त्यांना वाचनालयात सर्वत्र फिरवून आणले (अर्नेस्टच्या लहानपणी होती त्यापेक्षा ही नवीन इमारत होती) आणि आता लहान मुलांसाठी एक नवा विभाग सुरु करण्याची त्यांची योजना होती, त्याविषयीही त्यांना माहिती दिली. अर्नेस्ट सर्व लक्षपूर्वक ऐकत होता.

ही योजना पूर्णपणे तयार होण्यासाठी आणि बांधकामासाठी पुरेसे पैसे उभे करण्यात बराच काळ गेला. बऱ्याच वेळा या प्रकल्पाची समिती निराश होत असे आणि आता यात यश येणे शक्य नाही म्हणून हा विचार सोडून द्यावा अशा निष्कर्षापर्यंत येऊ लागली की अचानक काहीतरी चमत्कार घडत असे.

एक दिवस काहीच चांगले घडत नव्हते आणि सर्वजण फारच निराश झाले होते. निधी समितीची ज्या एका देणगीदारावर ‘ते नक्कीच मोठी देणगी देतील’ अशी भिस्त होती, त्यांनी या प्रकल्पाला मदत करायची नाही असे ठरवले असल्याचा निरोप आला होता.

“बहुधा आपण हा विभाग बांधावा असे नियतीच्या मनात नसेल. आपण हे काम थांबवावे असेच हे संकेत आहेत,” समितीचे एक सदस्य म्हणाले.

आणि त्याच वेळी नेहमी आनंदाने वाचनालयात येणारी एक मतिमंद मुलगी आपल्या आईबरोबर आत आली. पुस्तके घेऊन जाण्याच्या टेबलापाशी जाऊन तिने आपली ‘पिगी बँक’ टेबलावर ओतली. त्यातली नाणी टेबलावर पडत असताना ती सहजपणे म्हणाली, “हे देवाचे वाचनालय बांधण्यासाठी मी माझे सगळे पैसे घेऊन आले आहे.”

यानंतर मात्र कोणाचा विश्वास कधीच डळमळीत झाला नाही.

परंतु, इमारत पूर्ण होत आली तेव्हा वाचनालयात पुस्तके आणण्यासाठी निधी कुठून मिळेल याची चिंता संयोजकांना सतावू लागली.

“मुलांसाठी जर आपण पुस्तके आणू शकलो नाही, तर नुसत्या सुंदर नव्या इमारतीचा काय उपयोग?”

आता आणखी एका चमत्काराची गरज होती.

आणि मग एक पत्र आले. त्या पत्रावर न्यूयॉर्कच्या शिक्का होता.

त्या पत्राचा काही भाग पुढीलप्रमाणे होता,

“अर्नेस्ट एल. डॉसन यांच्या मालमत्तेचा व्यवस्थापक या नात्याने मी हे पत्र पाठवत आहे. श्री. डॉसन यांनी सेल्मा सार्वजनिक वाचनालयाला त्यांच्या वारसदारांपैकी एक म्हणून नमूद केले आहे. त्यांच्या कुटुंबाच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी १०,००० डॉलरची देणगी वाचनालयासाठी दिली आहे हे कळवण्यास मला आनंद होतो.”

कधी कधी सेल्मा सार्वजनिक वाचनालयातील मुले - सर्व वंशाची मुले - भिंतीवर लावलेल्या स्मितहास्य करणाऱ्या आणि हसऱ्या डोळ्यांच्या काळ्या गृहस्थांच्या फोटोकडे पाहण्यासाठी थांबतात. बहुतेक मुले फोटोखाली लिहिलेली ‘अर्नेस्ट डॉसन’ ही अक्षरे वाचता येण्याएवढी आणि त्या वाचनालयाच्या निर्मितीत एक क्षमा आणि प्रेमाचा चमत्कार घडला आहे हे समजण्याएवढी देखील मोठी नसतात.

समाप्त